नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २२/०९/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील सोनोली शिवार येथे दि. २१/०९/२२ चे ०५.०० वा. चे सुमारास **नत्थू परसुजी मुरोडिया(मृतक), वय ६५ वर्ष रा. गोन्ही** यांनी शेती पिकावर घेतलेल्या कर्जाचे चिंतेने व मुळव्याद व शुगर या बिमारीचे त्रासाने कंटाळून शेतातील विहीरीत उडी घेवुन मरण पावले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रूपेश नत्थू मुरोडिया, वय ३८ वर्ष रा. गोन्ही यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार गौरव आगरकर ८४२१७५५८४९ हे करीत आहे.

२) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील सावरगाव ते भारसिंगी रोड येथे दि. १४/०९/२२ चे १८.३५ वा. चे सुमारास **राजेंद्र पांडुरंग येवले (मृतक), वय ६८ वर्ष रा. भारसिंगी ता.नरखेड** हे अंकीतचे गाडीवर मागे बसुन भारसिंगी येथे जात असतांना रस्त्याने बैल आडवा आल्याने मागे बसलेले राजेंद्र येवले हे खाली पडले व बेशुध्द पडले. त्यांना उपचाराकामी सिम्स हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. मर्ग चे कागदपत्रे पो.स्टे. बजाज नगर, नागपुर शहर यांच्याकडुन प्राप्त झाल्याने पो.स्टे. काटोल येथे मर्ग क्र. ७६/२२ कलम १७४ जाफौ प्रमाणे दाखल करुण तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनि प्रमोद पारखी पो.स्टे. बजाज नगर, नागपुर शहर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक अविनाश बाहेकर ८४२१७५५८४९ हे करीत आहे.

३) पो.स्टे. खापा :– अंतर्गत २२ कि. मी. अंतरावरील मौजा रायवाडी शिवार येथे दि. १९/०९/२२ चे १८.०० वा. चे सुमारास **गंगाधर मारोती गजभिये(मृतक), वय ६० वर्ष रा. रायवाडी** हा आपल्या शेतातुन पायदल रायवाडी शिवार नाल्यातुन घरी येत असता अचानक पाण्याचा प्रवाह वाढल्याने तो पाण्यात वाहुन गेला. दि २१/०९/२०२२ चे ११.०० वा. खापा शिवारातील कन्हान नदीपात्रात सदर मृतकाचे प्रेत मिळाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रफुल गंगाधर गजभिये, वय ३० वर्ष, रा. रायवाडी यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. खापा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार प्रमोद बन्सोड मो.नं ९९२३४१०२२३ हे करीत आहे.

४) पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत पाटणसावंगी येथे दि. २१/०९/२२ चे १६.३० वा. चे सुमारास **शंकर बापूराव बोकडे(मृतक) वय ४२ वर्षे, रा. आष्टी जि. वर्धा ह.मु. पाटणसावंगी** यांना माहे ५/२०२२ पासुन पिलीया व पंडु रोग झाल्याने त्यांचा नागपूर तसेच कामठी येथील खाजगी दवाखान्यात उपचार सुरू होता. ते सध्या फिर्यादी यांचे कडे पाटणसावंगी येथे घरी राहुन सदर दवाखान्यात उपचार घेत होते. परंतु त्यांची प्रकृती जास्त खराब झाल्याने दि २१/०९/२०२२ रोजी साय ०४.३० वा. सुमारास फिर्यादीचे घरी पाटसावंगी येथे पिलीया व पंडू बिमारीने मरण पावले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— वामन बाळाजी पराते, रा. वार्ड क्र. १, पाटणसावंगी यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा बंडु कोकाटे मो. क्र. ९८२२९४३६०५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**